# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२२/०६/२०१८
## दि.२१/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २०८/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२३ वर्ष,रा.स्वारगेट,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम व एक महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०६/२०१८ रोजी दु.१२/१५ वा. स्वारगेट कॉर्नर सार्वजनिक रोडवर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पीएमपी बस मधुन उतरत असताना,यातील नमुद एक अनोळखी इसम व महिला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांचे गळयातील सोन्याची चैन ३०,०००/- रू किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संजय गायकवाड ९८२३९३८५५१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ४१७/१८,भादविक ३९४,३४,आर्म ॲक्ट ४(२५),मुं.पो.का.कलम ३७(१),सह १३५ |
| **फिर्यादी** | गिरीष रमनानी,वय-३३ वर्षे,रा.रिव्हर रोड,पिंपरी,पुंणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/४५ वा. पिंपरी भुयारी रस्त्यालगत पिंपरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दुचाकीवरून जात असताना,नमुद ठिकाणी पिंपरी भुयारी मार्ग येथे लघुशंकेसाठी थांबले असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे मित्र शिल्लु आसवाणी यांचे गळयावर कोयता ठेवुन त्यांना व फिर्यादीस हाताने मारहाण करुन,शिल्लु आसवाणी यांचे पॅन्टचे खिशातुन १४,९५०/- रुपये जबरदस्तीने काढुन घेतले. तसेच फिर्यादी यांचे खिशातुन आधार कार्ड,पॅन कार्ड,क्रेडिट कार्ड,मतदर कार्ड व बँकेचे डेबीट कार्ड काढुन घेवुन मोटार सायकलवरून पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बढे ८८८८८१३४५२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३०३/१८,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | हरिदास गायकवाड,वय-२८,रा.माताळवाडी,मुळशी,जि.पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०६/२०१८ रोजी २१/३१ वा. सेहगल शो-रूमचे समोर बावधन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची कार घेवुन जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे कारला ओव्हरटेक करीत असताना त्यांना हॉर्न का वालविला असे विचारल्याचे कारणावरून सदर इसमांनी फिर्यादी यांची कार साईडला घेवुन,फिर्यादी यांचे डोक्यात बेल्टने व हातावर मारहाण करून त्यांना जखमी करून,फिर्यादी यांचे खिशातील १,३००/- रूपये जबरदस्तीने काढुन घेतले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जी.जे.धामणे ७३५०००२२९५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १०३/१८,भादविक ४६८,४७१,४२० |
| **फिर्यादी** | चरणजीव सिंह,वय-५५ वर्षे,रा.सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपी** | मे.हरीष एंटरप्रायझेस प्रो.प्रा.हरीष गुंजाळ,रा.एन-२ सिडको,औरंगाबाद (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०५/२०१८ ते दि.०२/०६/२०१८ व दि.०५/०६/२०१८ ते दि.१८/०६/२०१८ रोजीचे कालावधीत बँक ऑफ बडोदा शाखा,कर्वे रोड,डेक्कन,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसम मे.हरीष एंटरप्रायझेस प्रो.प्रा.हरीष गुंजाळ याने सिटी युनियन बँक शाखा, वापी,जि.बलसाड,राज्य गुजरात येथील बचत खात्यामध्ये ॲटो रिर्सच असोसिएशन ऑफ इंडिया याचे बनावट चेकव्दारे १,९५,०००/- रुपये व १,९८,०००/- रुपये असे एकुण ३,९३,०००/- रुपये रकमेचा अपहार करुन,ॲटो रिर्सच असोसिएशन ऑफ इंडिया व फिर्यादी यांची बँक ऑफ बडोदा बँकेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.के.सोनवणे ८७८८७३८०७३ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३१७/१८,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | वैशाली चोरघे,वय-३८,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | एक इसम व दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०१/२०१८ ते दि.२१/०६/२०१८ रोजीचे कालावधीत वेळोवेळी मांगडेवाडी येथील घरात |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व दोन महिला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचेकडुन १,१६,४७०/- रूपये बँकेचे खात्यावर भरण्यास सांगुन,फिर्यादी यांना वेळोवेळी फोन करून शक्ती फायनान्सकडुन २०,२०,०००/- रूपये गृहकर्ज मंजुर करून देण्याकरीता त्यांचे ई-मेल एड्रेसवर फिर्यादी यांचा फॉर्म भरून घेवुन,त्यांची कागदपत्रे घेवुन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. आर.ए.पवार ९८२३२११५६३ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ४१९/१८,भादविक ४२०,४०६,३४ |
| **फिर्यादी** | जयरविंद्र अडसुळ,वय-५१ वर्षे,रा.थेरगाव,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८ नोव्हेंबर २०१७ रोजी ते आजपर्यंत घरोंदा हॉटेल मोरवाडी,पिंपरी,पुणे व साई ॲग्रो ट्रेड सर्व्हिसेस ए-स्क्वेअर बिल्डींग,प्राधिकरण नविन बिल्डींग ऑफिस नं.१०३,आकुर्डी,पुणे येथील ऑफिसवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी फिर्यादीं व त्यांचे मित्र सहकारी यांचा विश्वास संपादन करुन त्यांचे कडुन एकुण रोख ६० लाख रुपये रक्कम घेवुन,त्याबदल्यात त्यांना दाम दुप्पट पैसे करून देण्याचे बहाण्याने घेवुन,त्यांना अद्यापपर्यंत तसा कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता,त्यांना दिलेली मुळ रक्कम परत न देता,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, आर.झेड.मुंढे ८८८८८२४१७६ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७३३/१८,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | नंदा चौधरी,वय-५२ वर्षे,रा.मगरपट्टा,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०९/२०१७ ते दि.०९/०६/२०१८ रोजीचे कालावधी मध्ये टेलिफोन बँकिंगद्वारे बँकेच्या खात्या मधुन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना मिळालेल्या रक्कमेतुन कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे बँक खाते क्रमांक किंवा डेबीट कार्डाची गोपनीय माहिती उपलब्ध करुन घेवुन,नमुद कालावधी मध्ये टेलिफोन बँकिंगद्वारे बँकेचे खात्या मधुन एकुण १८,१६,८२०/- रुपये रक्कम काढुन घेऊन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) ए.के.बागवान ९८२३०२१४०९ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३९३/१८,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | अमोल डहाके,वय-४० वर्ष,रा.एनआयबीएम. रोड कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | कंपनीचे कॅशियर कामगार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०६/२०१८ रोजी सकाळी ०९/३० ते १८/०० वा.चे दरम्यान थॉमस कुक लिमी.७,कॉमर झोन बिल्डींग,आय.टी.पार्क येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे थॉमस कुक इंडया लिमी. या कंपनीचे जनरल मॅनेजर म्हणुन काम करीत असताना,त्यांची कंपनी वेग-वेगळया देशांचे करन्सीचे काम करते. तसेच वेग-वेगळया देशाचे करन्सी कंपनी प्रत्येक शाखेला व्यवहार पुर्ण करण्यासाठी देते. फिर्यादी यांचे कंपनीचे शाखेमध्ये कॅशियर म्हणुन काम करणारा कामगार काम करीत असताना, सदर कामगाराने ४,७५,६१९/- रुपये भारतीय चलनातील रक्कम,त्यामध्ये युएस डॉलर,ब्रिटन पाऊंड,युरो, जपानयेन,कॅनडा डॉलर,ऑस्ट्रेलिया डॉलर असे वेग-वेगळया देशाची करन्सी तसेच भारतीय चलनातील रोख रक्कम चोरून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लोहार ९८५०२२३१९० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**